नवराष्ट्र

# वैष्णवी मोरेचे स्विमिंग स्पर्धेत यश

**पुणे :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नागपूर यांच्या वतीने एनआयटी स्विमिंग पूल, अंबाझरी रोड, नागपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या १७ वर्षाखालील राज्यस्तरीय स्विमिंग स्पर्धेत मुलींच्या गटात सूर्यदत्ता पब्लिक स्कुलच्या वैष्णवी मोरे हिने ५० मीटर ब्रेस्टस्टोकमध्ये रौप्यपदक, १०० मीटर फ्रीस्टाईल आणि १०० मीटर ब्रेस्टस्ट्रोक प्रकारात कांस्यपदक पटकावले आहे. राज्यस्तरीय स्पर्धेत यश मिळवल्यानंतर वैष्णवीची आता राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. येत्या नोव्हेम्बरमध्ये नवी दिल्ली येथे राष्ट्रीय स्पर्धा होणार आहेत. तिने मिळवलेल्या या यशाबद्दल सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय चोरडिया आणि उपाध्यक्ष सुषमा चोरडिया, व्हायब्रट गुजरातचे टेक्निकल हेड अनुपम भेटणाकर, फिटनेस अँड स्पोर्ट डायरेक्टर निशिगंधा पाटील, संकेत नालकर यांनी अभिनंदन केले. याप्रसंगी बोलताना सूर्यदत्ताचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय चोरडिया म्हणाले, वैष्णवीने जलतरण स्पर्धेत मिळवलेले यश सूर्यदत्ता संस्थेसाठी अभिमानाची गोष्ट आहे. आता ती राष्ट्रीय स्पर्धेत सूर्यदत्ता पब्लिक स्कुलचे प्रतिनिधित्व करणार आहे.



वैष्णवीप्रमाणेच सूर्यदत्ता संस्थेतील विद्यार्थी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. या सगळ्या खेळाडूंना प्रोत्साहित करण्यासाठी वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. खेळामुळे मानसिक व शारीरिक आरोग्य उत्तम राहते. सामाजिक भान, सांघिक भावना, नेतृत्व, सहनशीलता आदी गोष्टी मुलांना त्यातून आत्मसात करता येतात. शिस्तीच्या सवयींबरोबरच त्यांना अपयशातून यश मिळवण्याचा विश्वास मिळतो. त्यामुळे 'सूर्यदत्ता'मध्ये खेळांनाही तितकेच महत्व दिले जाते. फिजिकल डायरेक्टरची एक टीम विद्यार्थ्यांमधील क्रीडागुण विकसित करण्यासाठी मेहनत घेत आहे.

Navarashtra Pune Plus Edition
26 Oct, 2019 Page No. 2